महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०,
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: https:// dte.maharashtra.gov.in

क्रमांक : १०/एनजीपी/पीसीआय/अंतिम मान्यता /२०२३-२४/ ९७२ दिनांक : 10 NOV 2023

कार्यालयीन आदेश :

विषय : फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली व शासन मान्यतेस अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून विनाअनुदान तत्वावर नवीन पदविका संस्था सुरु करण्यासाठी मान्यतेबाबत...

संदर्भ :

१. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: E-६४८१६०-HTED-१४०२५/११/२०२३-MHT-TE-५, दिनांक : ३१.०७.२०२३
२. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: E-६५१८४०-HTED-१४०२५/११/२०२३-MHT-(TE-५), दिनांक : ०१.०८.२०२३
३. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: E-६६०२१४-HTED-१४०२५/२२/२०२३-MHT-(TE-५), दिनांक : २५.०८.२०२३
४. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: E-६२८४६१-HTED-१४०२५-१०/२०२३-MHT (TE-५), दिनांक : ३०.०६.२०२३
५. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: E-६५६६९३-HTED-१४०२५/११/२०२३-MHT-(TE-५), दिनांक : १४.०८.२०२३

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: E-६५६६९३-HTED-१४०२५/११/२०२३-MHT-(TE-५), दिनांक : १४.०८.२०२३ फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया नवी दिल्ली या शिखर परिषदेच्या मान्यतेस अनुसरून शासनाने संदर्भाधीन शासन निर्णयान्वये सोबतच्या "विवरणपत्र अ" मध्ये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून कायम विनाअनुदानित तत्वावर औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सोबतच्या विवरणपत्र "अ" मधील संस्थांनी संदर्भाधीन शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या पुर्ततेबाबतची कागदपत्रे या संचालनालयास उपलब्ध करुन दिली आहेत. संबंधित संस्थांनी शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व शर्ती यांचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१८/प्र.क्र.२३/तांशि-४ दि. २२ फेब्रुवारी २०१८ अन्वये, संयुक्त खात्यात १० वर्ष मुदतीची मुदतठेव व निर्धारीत केलेले नोंदणी शुल्क इ. बाबतची कागदपत्रे सादर केली आहेत. तसेच महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता संलग्नता प्रदान केलेली आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेऊन संदर्भीन शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्ती सह खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून सोबतच्या विवरणपत्र अ मध्ये दर्शविलेल्या कायम विनाअनुदानित तत्वावर औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थ्यांना विहित पध्दतीने प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून परवानगी देण्यात येत आहे.

१. संचालक, किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली तसेच शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.

२. शुल्क नियामक प्राधिकरणाने/ फी निश्चिती समितीने निश्चित केलेल्या शुल्काबाबीत व संस्थेची इतर अनिवार्य बाबीसंबंधीची माहिती संस्था वेळोवेळी संस्थेच्या संकेतस्थळावर अद्ययावत करतील. तसेच संचालनालयाने निर्देशित केलेली माहिती संस्थांना संचालनालयामार्फत विकसित केलेल्या प्रवेश क्षमता मान्यतेच्या पोर्टलवर अद्ययावत करणे अनिवार्य राहील.

३. संबंधित पदविका अभ्यासक्रमांची तंत्रशिक्षण संचालनालय यांचेकडे नोंदणी व तद्अनुषंगिक कार्यवाही करणे आवश्यक राहील.

४. शासन, फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली व या संचालनालयाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार शासन / फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली, यांना राहतील.

५. शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१८/प्र.क्र.२३/तांशि-४ दि. २२ फेब्रुवारी २०१८ अन्वये ज्या बाबींसाठी दुस-या वर्षासाठी संयुक्त खात्यात मुदतठेव विहित केलेली आहे, अशा बाबींसाठी संबंधित संस्थांनी दुसरे शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापुर्वी संस्थेचे अध्यक्ष / सचिव व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे संयुक्त नांवे १० वर्षासाठीची मुदतठेवीची पावती पडताळणीसाठी संबंधित तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालयाकडे सादर करणे अनिवार्य राहील.

६. ज्या सस्थांच्या अभ्यासक्रमांना महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी संलग्नता अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रदान केली असल्यास संलग्नतेच्या आदेशातील अटी व शर्तीची पुर्तता संबंधित संस्थांना करणे बंधनकारक राहील. तसेच संबंधित संस्थांना मंडळाच्या नियमांप्रमाणे नियमित संलग्नता घेणे बंधनकारक राहील.

७. आग प्रतिबंधक प्रमाणपत्राचे सक्षम प्राधिकाऱ्यांकडून वेळोवेळी नुतनीकरण करणे अनिवार्य राहील.

८. विद्यार्थी, विद्यार्थीनी, महिला, मागासवर्गीय व सर्वसाधारण अधिकारी/ कर्मचारी यांच्या तक्रारींचे निवारण करण्याकरीता शिखर परिषद/ शासन/ महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांचे निर्देशानुसार स्वतंत्र समित्या गठित करणे अनिवार्य राहील.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती, शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती व या व्यतिरीक्त वेळोवेळी शासन / संचालनालय यांनी निर्गमित केलेल्या आदेशांचे काटेकोर पालन करणे विवरणपत्र "अ" मधील संस्थांना बंधनकारक राहील.

(डॉ.विनोद मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत- मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सादर.

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित :

१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, छ.संभाजीनगर/ मुंबई/ पुणे. (ईमेलव्दारे)
२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.
३. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, छ.संभाजीनगर/मुंबई/ पुणे.
४. संबंधित संस्था (ईमेलव्दारे)
५. कार्यासन क्र.३ आयटी सेल, मुख्य कार्यालय, मुंबई.
६. निवड नस्ती.

विवरणपत्र अ

फर्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली व शासन मान्यतेस अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून विनाअनुदान तत्वावर नवीन पदविका संस्था सुरु करण्यासाठी मान्यतेबाबत

| अ.क्र. | डीटीई संकेतांक | पीसीआय संकेतांक | शैक्षणिक संस्थेचे नांव | शैक्षणिक संस्थेचा पत्ता | विभाग | जिल्हा | शासन मान्यतेचा शासन निर्णय व दिनांक | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेश क्षमता | विद्यापीठ / मंडळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | छत्रपती संभाजीनगर विभाग | | | | | | |
| १ | २६४४ | PCI-६९४५ | एस.पी. कॉलेज ऑफ फार्मसी | पो. पाटोदा, बीड, पिन कोड - ४१४२०४ | छत्रपती संभाजी नगर | बीड | उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: E-६४८१६०-HTED-१४०२५/११/२०२३-MHT-TE-५, दिनांक : ३१.०७.२०२३ | औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम | ६० | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई |
| २ | २६५३ | PCI-८५५६ | विठाई डी. फार्मसी कॉलेज | जिरेवाडी, जालना रोड, बीड, पिन कोड - ४३११२२ | छत्रपती संभाजी नगर | बीड | उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: E-६५१८४०-HTED-१४०२५/११/२०२३-MHT-(TE-५), दिनांक : ०१.०८.२०२३ | औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम | ६० | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई |
| ३ | २६६० | PCI-८४०७ | धाराशिव इन्स्टिटयूट ऑफ फार्मास्युटिकल सायन्स अँड रिसर्च | धानोरा (शेलका) तालुका - कळंब, जिल्हा - धाराशिव, पिन कोड - ४१३५०७ | छत्रपती संभाजी नगर | धाराशिव | उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: E-६६०२१४-HTED-१४०२५/२२/२०२३-MHT-(TE-५), दिनांक : २५.०८.२०२३ | औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम | ६० | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई |
| | | | | मुंबई विभाग | | | | | | |
| ४ | ३५३८ | PCI-६२३५ | सिंधुदुर्ग एज्युकेशन सोसायटीज कॉलेज ऑफ फार्मसी, तोंडवली | ०२, नांदगाव फोंडा रोड, विद्यानगरी, तोंडवली, तालुका कणकवली, जिल्हा सिंधुदुर्ग, पिन कोड - ४१६६०१ | मुंबई | सिंधुदुर्ग | उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: E-६२८४६१-HTED-१४०२५-१०/२०२३-MHT (TE-५), दिनांक : ३०.०६.२०२३ | औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम | ६० | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई |
| ५ | ३५४५ | PCI-८७८० | सिध्दार्थ कॉलेज ऑफ फार्मसी अँड रिसर्च सेंटर | एस.एस. नॉलेज सेंटर, बोरदपाडा, पो. चारगाव, बदलापूर-म्हासारोड, बदलापूर (प.), ता. अंबरनाथ, जि. ठाणे, पिन कोड-४२१५०३ | मुंबई | ठाणे | उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: E-६[illegible]२२९९-HTED-१४०२५/११/२०२३-MHT (TE-५), दिनांक : ३१.०८.२०२३ | औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम | ६० | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई |
| | | | | पुणे विभाग | | | | | | |
| ६ | १६१०५ | PCI-८३३० | सतीश देसाई इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी | ता. गगनबावडा जि. कोल्हापूर, पिन कोड - ४१६२०६ | पुणे | कोल्हापूर | उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: E-६५६६९३-HTED-१४०२५/११/२०२३-MHT-(TE-५), दिनांक : १४.०८.२०२३ | औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम | ६० | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई |

DIRECTORATE

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई